प्रेस नोट | दिनांक ३१/०५/२०२२

**यातील लोकसेवकाने फिर्यादी यांच्याविरुध्द गुन्हा दाखल न करण्याकरीता फिर्यादी यांचेकडे लाचेची मागणी करुन तडजोडीअंती लाचेची रक्कम स्विकारल्याने गुन्हा नोंद.**

| | | |
|---|---|---|
| १ | ला.प्र.वि.कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई. |
| २ | गु.र.क्र | २८/२०२२ |
| ३ | कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| ४ | आरोपी लोकसेवकाचे नांव कार्यालयाचा पत्ता | श्री स्वप्निल बबनराव मासळकर, वय ३५ वर्षे, वर्ग-२, सहाय्यक पोलीस निरीक्षक, नेमणूक – खार पोलीस ठाणे, मुंबई |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ८०,०००/– |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. ७०,०००/– |
| ७ | हस्तगत लाचेची रक्कम | रु. ७०,०००/– |
| ८ | थोडक्यात हकीगत | यातील फिर्यादी यांच्या मालकीचे इमारतीस महानगरपालीकेकडून धोकादायक इमारत म्हणून नोटीस बजावल्याने, फिर्यादी यांनी नमूद इमारतीच्या आजूबाजूस लोखंडी पत्रे लावलेले आहेत. त्यामुळे नमूद बिल्डींगमधील दुकानदारांनी दुकानांमध्ये ये-जा करण्यासाठी बेकायदेशिर प्रतिबंध होत असलेबाबत फिर्यादी यांच्याविरोधात खार पोलीस ठाणे येथे तक्रार अर्ज केलेला आहे. नमूद तक्रार अर्जाच्या अनुषंगाने फिर्यादी यांचे विरोधात गुन्हा दाखल न करण्यासाठी लोकसेवक यांनी फिर्यादी यांचेकडे रू. ८०,०००/– रक्कमेच्या लाचेची मागणी केली.<br><br>फिर्यादी यांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे त्यांनी दि. २७/०५/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष हजर राहून लेखी तक्रार केली.<br><br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दि.२८/०५/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी फिर्यादी यांच्याकडे तडजोडीअंती रू. ७०,०००/–इतक्या रकमेची लाच स्वरूपात मागणी करून ती स्विकारण्याचे कबूल केले.<br><br>आज दि. ३०/०५/२०२२ रोजी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवकाने मागणी केलेली लाचेची रक्कम रू. ७०,०००/– फिर्यादी यांच्याकडून स्विकारली असता, लोकसेवकास रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणून गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

31/05/22

( संजय पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.


<u>संपर्क</u>:–लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२–२४९२१२१२,
फॅक्स क्र. ०२२–२४९२२६१८,
वेबसाईट – acbmaharashtra.gov.in,
ईमेल :acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल :addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक:www.facebook.com Maharashtra ACB.